भारत सरकार
विधि, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# विभागीय चौकशी (साक्षीदारांना हजर राहण्यास भाग पाडणे व दस्तऐवज दाखल करवणे) अधिनियम, १९७२

(१९७२ चा अधिनियम क्रमांक १८)

[१ जुलै, १९८० रोजी अंमलात असल्याप्रमाणे]

# The Departmental Inquiries ( Enforcement of Attendance of Witnesses and Production of Documents ) Act, 1972

**(Act No. 18 of 1972)**

[*As in force on the 1st July, 1980*]

संचालक, मुद्रण व लेखन सामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने
मुद्रित व प्रकाशित केले
१९८१

[ किंमत ५० पैसे ]

# विभागीय चौकशी (साक्षीदारांना हजर राहण्यास भाग पाडणे व दस्तऐवज दाखल करवणे) अधिनियम, १९७२


**कलमांचा क्रम**

कलमे

१. संक्षिप्त नाव व विस्तार.

२. हा अधिनियम ज्यांना लागू होईल ती विभागीय चौकशीची कामे.

३. व्याख्या.

४. कलम ५ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शक्तींचा वापर करण्यास प्राधिकृत करण्याची केंद्र शासनाची शक्ती.

५. प्राधिकृत चौकशी प्राधिकरणाची साक्षीदारांना हजर राहण्यास भाग पाडण्याची व दस्तऐवज दाखल करवण्याची शक्ती.

६. कलम ५ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शक्तींचा वापर ज्यांमध्ये करता येईल त्या क्षेत्रीय सीमा.

७. नियम करण्याची शक्ती.

# विभागीय चौकशी (साक्षीदारांना हजर राहण्यास भाग पाडणे व दस्तऐवज दाखल करवणे) अधिनियम, १९७२

## (१९७२ चा अधिनियम क्रमांक १८)

[३१ मे, १९७२]

विवक्षित विभागीय चौकशीच्या कामांमध्ये साक्षीदारांना हजर राहण्यास भाग पाडणे व दस्तऐवज दाखल करवणे यांसाठी व तत्संबंधित अथवा तदानुषंगिक बाबींसाठी उपबंध करण्याकरिता अधिनियम.

भारतीय गणराज्याच्या तेविसाव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :––

१. (१) या अधिनियमास 'विभागीय चौकशी (साक्षीदारांना हजर राहण्यास भाग पाडणे व दस्तऐवज दाखल करवणे) अधिनियम, १९७२' असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव व विस्तार.

(२) त्याचा विस्तार जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकरून संपूर्ण भारतभर आहे.

२. पुढील व्यक्तींच्या बाबतीत करण्यात आलेल्या प्रत्येक विभागीय चौकशीस या अधिनियमाचे उपबंध लागू होतील.–– हा अधिनियम ज्यांना लागू होईल ती विभागीय चौकशीची कामे.

(क) संघराज्याच्या कारभाराशी संबंधित असलेल्या लोकसेवांमध्ये किंवा तशा पदांवर नियुक्त केलेल्या व्यक्ती;

(ख) संघराज्याच्या कारभाराशी संबंधित असलेल्या कोणत्याही लोकसेवेमध्ये किंवा तशा पदावर नियुक्त करण्यात आलेल्या असून ज्या व्यक्ती––

(एक) कोणत्याही संघ राज्यक्षेत्रातील कोणतेही स्थानिक प्राधिकरण ;

(दोन) एखाद्या केंद्रीय अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली स्थापन झालेला आणि केंद्र शासनाच्या मालकीचा किंवा त्याच्या नियंत्रणाखाली असलेला कोणताही निगम ;

(तीन) ज्या कंपनीतील भरणा झालेल्या भागभांडवलापैकी किमान एक्कावन्न टक्के एवढ्या भांडवलाचे शेअर्स केंद्र शासनाने धारण केलेले असतील अशी, 'कंपनी अधिनियम, १९५६' (१९५६ चा १) याच्या कलम ६१७ च्या अर्थानुसार असलेली कोणतीही शासकीय कंपनी किंवा अशा शासकीय कंपनीची कोणतीही दुय्यम कंपनी ;

(चार) ज्या संस्थेची 'संस्था नोंदणी अधिनियम, १८६०' (१८६० चा २१) याखाली नोंदणी झालेली असून जी केंद्र शासनाच्या नियंत्रणाखाली असेल अशी कोणतीही संस्था;

यांच्या सेवेत असतील किंवा त्यांच्याकडून वेतन घेत असतील त्या व्यक्ती.

३. या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ,–– व्याख्या.

(क) "विभागीय चौकशी" याचा अर्थ, हा अधिनियम लागू असलेल्या कोणत्याही व्यक्ती-विरुद्ध सचोटीच्या अभावासंबंधाने करण्यात आलेल्या कोणत्याही अभिकथनासंबंधीः––

(एक) संस्थेने केलेला कोणताही कायदा अथवा त्याखाली करण्यात आलेला कोणताही नियम, किंवा

(दोन) भारतीय संविधानाचा अनुच्छेद ३०९ याच्या परंतुकाखाली केलेला किंवा अनुच्छेद ३१३ अन्वये चालू राहिलेला कोणताही नियम,

याखाली आणि यानुसार चालविलेली चौकशी असा आहे;

(ख) "चौकशी प्राधिकरण" याचा अर्थ, केंद्र शासनाने किंवा त्याला दुय्यम असणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा प्राधिकरणाने विभागीय चौकशी चालवण्यासाठी नियुक्त केलेला कोणताही अधिकारी किंवा प्राधिकरण असा आहे आणि त्यामध्ये, त्या त्या काळी अंमलात असलेला कोणताही कायदा किंवा नियम याद्वारे किंवा त्याखाली ज्यास अशी चौकशी चालवण्याची शक्ती प्रदान करण्यात आली असेल अशा कोणत्याही अधिकाऱ्याचा किंवा प्राधिकरणाचा समावेश आहे;

(ग) "सचोटीचा अभाव" यामध्ये लाचलुचपत किंवा भ्रष्टाचार याचा समावेश आहे.

४. (१) एखाद्या विभागीय चौकशीच्या प्रयोजनार्थ एखाद्या वर्गातील किंवा प्रवर्गातील व्यक्तींना साक्षीदार म्हणून बोलावणे किंवा त्यांच्याकडून कोणताही दस्तऐवज मागवणे आवश्यक आहे असे जर केंद्र शासनाचे मत असेल तर, ते शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे अशा वर्गातील किंवा प्रवर्गातील कोणत्याही व्यक्तीच्या संबंधात कलम ५ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शक्तीचा वापर करण्यासाठी चौकशी प्राधिकरणास प्राधिकृत करू शकेल आणि त्यानंतर चौकशी प्राधिकरणाला विभागीय चौकशीच्या कोणत्याही टप्प्याला अशा शक्तीचा वापर करता येईल. कलम ५ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शक्तींचा वापर करण्यास प्राधिकृत करण्याची केंद्र शासनाची शक्ती.

(प्र. दोन. ब) एच् ४३१५––२(५३०–१–८१)

(२) पोटकलम (१) द्वारे केंद्र शासनास प्रदान करण्यात आलेली शक्ती, ज्या व्यक्तीविरुद्ध विभागीय चौकशी चालवण्यात येत असेल त्या व्यक्तीच्या संबंधातील नियुक्ति-प्राधिकरणापेक्षा कनिष्ठ नसेल असे जे प्राधिकरण यासंबंधात केंद्र शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा प्राधिकरणालासुद्धा वापरता येईल.

प्राधिकृत चौकशी प्राधिकरणाची साक्षीदारांना हजर राहण्यास भाग पाडण्याची व दस्तऐवज दाखल करवण्याची शक्ती.

५. (१) कलम ४ अन्वये प्राधिकृत करण्यात आलेल्या प्रत्येक चौकशी प्राधिकरणाला (यात यानंतर त्याचा "प्राधिकृत चौकशी प्राधिकरण" असा निर्देश करण्यात आलेला आहे) पुढील बाबींच्या संबंधात, एखाद्या दाव्याची संपरीक्षा करताना 'दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८' (१९०८ चा ५) याखाली दिवाणी न्यायालयाकडे ज्या शक्ती निहित करण्यात आल्या आहेत त्याच शक्ती असतील, त्या बाबी अशा :––

(क) कोणत्याही साक्षीदारास समन्स पाठविणे व त्याला हजर राहण्यास भाग पाडणे आणि त्याची शपथेवर तपासणी करणे;

(ख) पुरावा म्हणून दाखल करण्याजोगा असेल असा कोणताही दस्तऐवज किंवा इतर सामग्री शोधून प्रकट करावयास आणि दाखल करावयास लावणे;

(ग) कोणत्याही न्यायालयाकडून किंवा कार्यालयाकडून कोणताही सार्वजनिक अभिलेख मागवणे.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, प्राधिकृत चौकशी प्राधिकरण हे भारतीय रिझर्व्ह बँक, भारतीय स्टेट बँक, 'भारतीय स्टेट बँक (दुय्यम बँका) अधिनियम, १९५९' (१९५९ चा ३८) याचे कलम २-खंड (ट) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे असलेली कोणतीही दुय्यम बँक किंवा 'बँक-व्यवसायी कंपन्या (उपक्रमांचे संपादन व हस्तांतरण) अधिनियम, १९७०' (१९७० चा ५) याच्या कलम ३ अन्वये घटित केलेली कोणतीही समनुरूप नवीन बँक यांना पुढील गोष्टी करण्यास भाग पाडणार नाही :––

(क) भारतीय रिझर्व्ह बँक, भारतीय स्टेट बँक, ती दुय्यम बँक किंवा समनुरूप नवीन बँक यांच्या म्हणण्याप्रमाणे गोपनीय स्वरूपाची असलेली अशी कोणतीही हिशेबपुस्तके किंवा असे इतर दस्तऐवज दाखल करणे, किंवा

(ख) अशी कोणतीही पुस्तके किंवा दस्तऐवज हा विभागीय चौकशीतील कार्यवाहीच्या कागदपत्रांचा एक भाग बनवणे, किंवा

(ग) अशी कोणतीही पुस्तके किंवा दस्तऐवज दाखल केले गेल्यास आपल्या समोरील कोण-त्याही पक्षकारास किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीस त्यांची तपासणी करू देणे.

(३) कोणत्याही साक्षीदारास हजर राहण्यास भाग पाडण्यासाठी किंवा कोणताही दस्तऐवज दाखल करवण्यासाठी प्राधिकृत चौकशी प्राधिकरणाने काढलेली प्रत्येक आदेशिका, ती ज्या व्यक्तीवर किंवा साक्षीदारावर बजावण्यात यावयाची असेल किंवा तिची अंमलबजावणी करण्यात यावयाची असेल ती व्यक्ती किंवा तो साक्षीदार ज्या जिल्हा न्यायाधीशाच्या स्थानिक सीमांमध्ये स्वेच्छेने राहत असेल किंवा कामधंदा करीत असेल किंवा प्राप्तीसाठी व्यक्तिशः काम करीत असेल त्या जिल्हा न्यायाधीशामार्फत बजावण्यात येईल किंवा तिची अंमलबजावणी करण्यात येईल; आणि अशा कोणत्याही आदेशिकेच्या अवज्ञेबद्दल कारवाई करण्याच्या प्रयोजनार्थ, अशी प्रत्येक आदेशिका ही जिल्हा न्यायाधीशाने दिलेली आदेशिका असल्याचे मानण्यात येईल.

(४) या अधिनियमाखाली कोणतीही विभागीय चौकशी करणारे प्रत्येक प्राधिकृत चौकशी प्राधि-करण हे 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८' (१८९८ चा ५) याची कलमे ४८० व ४८२ यांच्या प्रयोजनार्थ, दिवाणी न्यायालय असल्याचे मानण्यात येईल.

कलम ५ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शक्तींचा वापर ज्यांमध्ये करता येईल त्या क्षेत्रीय सीमा.

६. कलम ५ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शक्तींचा वापर करण्याच्या प्रयोजनार्थ, प्रत्येक प्राधिकृत चौकशी प्राधिकरणाची क्षेत्रीय अधिकारिता ही, जेवढ्या क्षेत्रावर या अधिनियमाचा विस्तार असेल तेवढ्या क्षेत्रापुरती विस्तारित असेल.

नियम करण्याची शक्ती.

७. (१) या अधिनियमाच्या उपबंधांची अंमलबजावणी करण्यासाठी केंद्र शासनास **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियम करता येतील.

(२) या कलमाखाली केंद्र शासनाने केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यावर होईल तितक्या लवकर संसदेच्या प्रत्येक सभागृहापुढे, ते एका सत्राने बनलेल्या अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या एकूण तीस दिवसांच्या कालावधीसाठी सत्रासीन असताना ठेवण्यात येईल, आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर, त्या नियमामध्ये कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले किंवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, तो नियम त्यानंतर, अशा आपरिवर्तित रूपातच परिणामक होईल किंवा, प्रकरणपरत्वे, तो मुळीच परिणामक होणार नाही; तथापि, अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या नियमाखाली केलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

# THE DEPARTMENTAL INQUIRIES (ENFORCEMENT OF ATTENDANCE OF WITNESSES AND PRODUCTION OF DOCUMENTS) ACT, 1972

# विभागीय चौकशी (साक्षीदारांना हजर राहण्यास भाग पाडणे व दस्तऐवज दाखल करवणे) अधिनियम, १९७२

## इंग्रजी–मराठी शब्दसूची

| | | | |
|---|---|---|---|
| authorised inquiring authority | प्राधिकृत चौकशी प्राधिकरण | .. | [S. 5 (*1*)] |
| bribery | लाचलुचपत | .. | [S. 3 (*c*)] |
| corruption | भ्रष्टाचार | .. | [S. 3 (*c*)] |
| departmental inquiry | विभागीय चौकशी | .. | [S. 3 (*a*)] |
| inquiring authority | चौकशी प्राधिकरण | .. | [S. 3 (*b*)] |
| lack of integrity | सचोटीचा अभाव | .. | [S. 3 (*c*)] |
| paid-up share capital | भरणा झालेले भागभांडवल | .. | [S. 2 (*b*) (*iii*)] |
| public record | सार्वजनिक अभिलेख | .. | [S. 5 (*1*) (*c*)] |

# विभागीय चौकशी (साक्षीदारांना हजर राहण्यास भाग पाडणे व दस्तऐवज दाखल करवणे) अधिनियम, १९७२

# THE DEPARTMENTAL INQUIRIES (ENFORCEMENT OF ATTENDANCE OF WITNESSES AND PRODUCTION OF DOCUMENTS) ACT, 1972

## मराठी–इंग्रजी शब्दसूची

| | | | | |
|---|---|---|---|---|
| चौकशी प्राधिकरण | .. | inquiring authority | .. | [S. 3 (*b*)] |
| प्राधिकृत चौकशी प्राधिकरण | .. | authorised inquiring authority | .. | [S. 5 (*1*)] |
| भरणा झालेले भागभांडवल | .. | paid-up share capital | .. | [S. 2 (*b*) (*iii*)] |
| भ्रष्टाचार | .. | corruption | .. | [S. 3 (*c*)] |
| लाचलुचपत | .. | bribery | .. | [S. 3 (*c*)] |
| विभागीय चौकशी | .. | departmental inquiry | .. | [S. 3 (*a*)] |
| सचोटीचा अभाव | .. | lack of integrity | .. | [S. 3 (*c*)] |
| सार्वजनिक अभिलेख | .. | public record | .. | [S. 5 (*1*) (*c*)] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई